Times of India

# SUK postpones convocation as Maharashtra gets new governor

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** With the state getting a new governor, who is also the de facto Chancellor of universities, the Shivaji University Kolhapur (SUK) has decided to postpone its 59th annual convocation ceremony, earlier scheduled to take place on Thursday.

Earlier, then-governor Bhagat Singh Koshyari was the chief guest for the convocation ceremony planned on February 16. Now, Ramesh Bais has become the next Governor of Maharashtra. As per tradition, the governor is the chief guest of the convocation ceremony. He/she presides over the function to hand over certificates of degrees, diplomas and PhDs to the students. However, Bais is yet to assume charge.

The SUK, on Tuesday, issued a public notice stating that the 59th convocation, taking place on February 16, is cancelled and a new date will be announced later.

The officials, on the condition of anonymity, said university Vice-Chancellor D T Shirke will make a fresh invitation to the new governor once he assumes charge and get a new date to ensure his presence at the function.

Meanwhile, the SUK officials have clarified that the postponement of the convocation has nothing to do with the threats by local outfits. The outfits, angry over Koshyari's disrespectful remarks about the icons of Maharashtra, had threatened to disrupt the function and even condemned Shirke for inviting Koshyari.

लोकमत

# विद्यापीठ परीक्षांमध्ये ८ गैरप्रकारांची नोंद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांमध्ये सोमवारी आठ गैरप्रकारांची नोंद झाली आहे. दिवसभरात एकूण २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण १९,९७७ विद्यार्थी उपस्थित होते. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.ए.बी.एड., बी.सी.ए., बी.फार्म., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.बी.ए., व्होकल अॅन्ड इन्स्ट्रूमेंटल म्युझिक, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, व्हॅल्यूएशन ऑफ रिअल इस्टेट अशा एकूण २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी सोमवारी एकूण १९,९७७ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, या परीक्षेत कोल्हापूर जिल्ह्यातून ८ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत झालेली आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव यांनी केले आहे.

लोकमत

# नाईट कॉलेजमध्ये मोडी लिपी अभ्यासक्रम

कोल्हापूर : मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी नाईट कॉलेजच्या मराठी विभागामार्फत २० फेब्रुवारीला एक महिन्याचा मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या मान्यतेच्या या अभ्यासक्रमात मोडीलिपीचे वाचन व लेखन यांचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. नाईट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ या वेळेत इयत्ता दहावी उत्तीर्ण असणाऱ्या इच्छुकांनी २० फेब्रुवारीपर्यंत मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्र. प्राचार्य एस. जे. फराकटे यांनी केले आहे.

महासत्ता

# आजीवन अध्ययनचे अभ्यासक्रम समाजाभिमुख-डॉ.देशमुख

कोल्हापूर, ता.१३ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठात आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे सर्व अभ्यासक्रम समाजाभिमुख असल्याचे मत डॉ. एम.एस.देशमुख यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठात आजीवन अध्ययन व विस्तार विभागात मोफत टेरारियम या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. टेरारियम कार्यशाळेचे मुख्य व्याख्याते अक्षय घोरपडे व अभिजित जाधव हे होते. डॉ.एम.एस.देशमुख म्हणाले की, निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांतर्गत सर्व अभ्यासक्रम समाजातील युवक-युवती, स्त्री-पुरुष अशा सर्व कार्यशक्तीला प्रेरणा देणारे व जीवनकौशल्य शिकविणारे आहेत. ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी जीवन कसे जगावे अशा पध्दतीचे अनेक उपक्रम घेतले जातात. टेरारियम हा व्यावसायिक दृष्टिकोन व आर्थिक गुणवत्ता वाढवणारा कार्यक्रम आहे. २०२० चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, कौशल्य, रोजगार निर्माण करणारे, समानता देणारे शैक्षणिक धोरण असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

स्वागत डॉ.सुमन बुवा यांनी केले. प्रास्ताविक संचालक डॉ. आर.जी.पवार यांनी केले. आभार श्वेता आठवले यांनी मानले, तसेच उदय घाटे, प्रा.वाय.एस. बोकिल, आर.एम.जाधव उपस्थित होते.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठात पथनाट्य स्पर्धा संपन्न

कोल्हापूर, ता. १३ (प्रतिनिधी) -

शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या बेटी बचाओ अभियान अंतर्गत शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील व शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पथनाट्य स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेमध्ये स्त्री भ्रुणहत्या, स्त्री सबलीकरण, स्त्री शिक्षण व स्त्रीयांचा समाजातील दर्जा या विषयावर पथनाट्य स्पर्धा घेण्यात आली. प्रास्ताविक व परिक्षकांची ओळख बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा बी. देसाई यांनी केली. या स्पर्धेत एकुण पंधरा संघांनी सहभाग घेतला होता. आभार बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा बी. देसाई यांनी मानले.

महासत्ता



# डॉ. जगन कराडे यांच्या ग्रंथास आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर ता.१३ (प्रतिनिधी)-**

..............................

बाबासाहेब आंबेडकर वेल्फेअर असोसिएशन, मलेशिया व जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन क्वालालंपूर, मलेशिया येथे ता. ४ ते ५ फेब्रुवारी रोजी पार पडले. यामध्ये ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत, शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांना केंब्रीज, लंडन येथून प्रकाशित झालेला त्यांचा ग्रंथ त्याची १२ वी आवृत्ती प्रकाशित होत असताना आंतरराष्ट्रीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ठ ग्रंथ पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला देश विदेशातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.

डॉ. जगन कराडे यांच्या ग्रंथाची सहावी आवृत्ती लंडन मधून प्रकाशित होत असतानाच मराठी समाजशास्त्र परिषदेने डॉ. सुर्यकांत घुगरे उत्कृष्ट संशोधन ग्रंथ पुरस्कार तसेच डॉ. प्रदीप आगलावे उत्कृष्ठ प्राध्यापक व संशोधक पुरस्कार म्हणून गौरविण्यात आले होते. त्यांच्या पुरस्काराबद्दल साहीत्य क्षेत्र, शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यक्तींनी कौतुक केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र पदवी, पदव्युत्तर परीक्षेला १९ हजार १७७ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रांतर्गत परीक्षेसाठी मंगळवारी १९ हजार १७७ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकांकडून कोल्हापूर जिल्ह्यातून ८ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली आहे. विद्यापीठ ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बी.एस्सी., एम.कॉम., एम.एस्सी., बी.एस्सी. (संगणकशास्त्र), एमबीए, बीसीए, बी.फार्मसी, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, बॅचलर ऑफ एज्युकेशन आदी २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागात झाल्या.

पुढारी

# विद्यापीठात २५ फेब्रुवारीपासून मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, इतिहास अधिविभागातर्फे २५ फेब्रुवारी ते ४ मार्च या कालावधीत मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजित करण्यात आले आहे. १९६० पूर्वीच्या शेतीसंबंधीच्या नोंदी, जन्म-मृत्यू नोंदी, खरेदी पत्र तसेच या काळातील न्यायालयीन दावे यासंबंधीची सर्व कागदपत्रे ही मोडी लिपीत उपलब्ध आहेत. मोडी लिपीचे ज्ञान असणारी व्यक्ती अशा कागदपत्राचे लिप्यांतर करून योगदान देऊन उपजीविकेचा प्रश्न सोडवू शकतात. मोडी लिपी ज्ञानाचा सर्वाधिक फायदा इतिहास व तत्सम सामाजिक शास्त्रात संशोधन करून इच्छिणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना होणार आहे. प्रशिक्षण कार्यशाळा मोडी पंडित मच्छिंद्र चौधरी, डॉ. नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यशाळेसाठी शैक्षणिक पात्रता पदवी व प्रवेश विनामूल्य आहे.

पुढारी

# विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनास जयपाल कुन्नुरे यांच्याकडून देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी जयपाल कुन्नुरे यांनी ४९ हजार रुपयांची देणगी प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी एस पाटील, कुलसचिव डॉ. व्ही एन. शिंदे यांनी कुन्नुरे यांचे आभार मानले.

पुण्यनगरी

# विद्यापीठ परीक्षेत जिल्ह्यात आठ गैरप्रकार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २ जानेवारीपासून सुरू आहेत. मंगळवारी एकूण २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने महाविद्यालये व अधिविभागांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. एकूण १९ हजार ९७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर कोल्हापूर जिल्ह्यात ८ गैरप्रकारांची नोंद झाली आहे. विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे दि. २, ३, ४ फेब्रुवारी रोजी स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. दिवसभरात सांगली व सातारा जिल्ह्यांतून कोणत्याही गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद झाली नाही, तर कोल्हापूर जिल्ह्यातून ८ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत मंगळवारी पदवी व पदव्युत्तरच्या २५ अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. ११ हजार ९७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेला बी. एस्सी., एम. कॉम., बी. कॉम., एम. एस्सी., बी. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स इंटर), एम. ए., बी. ए., बी. एस्सी., बी. फार्मा, बी. सी. ए. यासह अन्य विषयांच्या परीक्षा झाल्या. परीक्षा प्रमाद समितीकडे ८ गैरप्रकार आढळले आहेत. संबंधितांची चौकशी परीक्षा प्रमाद समितीकडे होणार आहे.